स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन आराखडा

"महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा तुलनात्मक अभ्यास"

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पी. एचडी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

आरती भाऊसाहेब होगे.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहत्रे,

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

“ महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा तुलनात्मक अभ्यास ”

प्रस्तावना (Introduction) :

निरोगी आरोग्य हे सर्वांची मुलभूत गरज आहे. गावात शहरात व संपूर्ण राज्यात गुणात्मक सार्वजनिक आरोग्य सेवा प्रदान करणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. भारताने सर्वप्रथम 1983 मध्ये राष्ट्रीय आरोग्य धोरण तयार केले. विकासाच्या गरजेसाठी बालमृत्यु, माता व गर्भाधान मृत्यु यांचा विचार केला. भारतातील जनतेच्या राहणीमानाचा दर्जा वाढवणे तिचे चांगले पोषण होणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे ही प्रत्येक राज्याच्या शासनाची जबाबदारी आहे. कित्येकदा शासनाच्या निष्काळजीपणामुळे, सेवा सुविधांच्या अभावापोटी सामान्य नागरिकांना जीव गमवावा लागतो, ही एक गंभीर बाब आहे. मार्टिन लूथर किंग यांनी म्हटलं आहे, “सर्व प्रकारचे भेदभाव आणि असमानता यामध्ये आरोग्य सेवा मिळण्यातील अन्याय सर्वात धक्कादायक आणि अमानवीय बाब आहे.”

महाराष्ट्र राज्य हे नागरिकांना पुरेशा व दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्यास खरंच वचनबद्ध आहे का? राज्याच्या विविध आरोग्यासंबंधित योजनांचा नागरीकांना पुरेपुर लाभ मिळतो का? मिळतो तर लोकांचे आरोग्य अजून सुदृढ का नाही? निरोगी का नाही? महाराष्ट्र राज्याचा आरोग्यावर तर प्रचंड प्रमाणात खर्च होतो, परंतु अजूनही अनेक खेडय़ात आरोग्यावर खर्च केला जात नाही. सार्वजनिक आरोग्य सेवेवर किती खर्च होतो याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

गुजरात राज्यातसुद्धा सार्वजनिक आरोग्य सेवेचा प्रश्न निर्माण होतो. लसीकरण व इतर आरोग्यविषयक योजना असतानाही गुजरात राज्याच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह का?

सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना पिण्याचे स्वच्छ पाणी व स्वच्छतागृह खरंच वापरण्यायोग्य मिळतात का? करोना संसर्गाचा विदारक अनुभव गाठीशी असूनही राज्यात सर्वसमावेशक आरोग्य धोरणाचा अभाव सातत्याने दिसून येत आहे.

महाराष्ट्र व गुजरात या राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेवर होणारा खर्च किती आहे, या दोन्ही राज्यातील पायाभूत सुविधा, निधी, कर्मचारी यांचा कसा मेळ बसतो याचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे

संशोधनाची आवश्यकता (Need of Research) :

"*आरोग्यम् धनसंपदा*" आरोग्य हीच खरी संपत्ती. परंतु महाराष्ट्र व गुजरात राज्य नागरीकांच्या आरोग्य सेवेसाठी खर्च करण्यास हलगर्जीपणा करत आहे का? महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी या दोन राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही राज्यांचा आरोग्यावर होणाऱ्या आर्थिक खर्चाचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे. महाराष्ट्र व गुजरात राज्यापैकी कोणत्या राज्याचा खर्च आरोग्यसेवेसाठी योग्यप्रकारे केला जातो? आरोग्य सेवेला महत्त्व प्राप्त करून देण्यासाठी हे संशोधन आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research) :

1. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्र व गुजरात राज्यात सार्वजनिक आरोग्यावर होणाऱ्या खर्चाचा अभ्यास करणे.
3. महाराष्ट्र व गुजरात राज्यात राबवल्या जाणाऱ्या आरोग्यविषयक योजनांचा अभ्यास करणे.
4. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील राबवल्या जाणाऱ्या आरोग्यविषयक योजनांचे मूल्यमापन करणे.
5. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील आरोग्यविषयक राबवल्या जाणाऱ्या योजनांच्या लाभाचा अभ्यास करणे.

6. महाराष्ट्र व गुजरात राज्यात राबवत असलेल्या आरोग्यविषयक योजनापैकी किती योजना प्रत्यक्षात लाभार्थ्यांपर्यंत पोचतात याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीत कृत्ये (Research Hypothesis) :

1. गुजरात पेक्षा महाराष्ट्र राज्याची आरोग्याची स्थिती सुदृढ आहे.
2. गुजरात व महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य योजनांमुळे राज्याचा विकास झाला आहे.
3. महाराष्ट्र व गुजरात राज्यात आरोग्यावर जास्तीत जास्त खर्च केला जात आहे.
4. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील नागरिक निरोगी जीवन जगत आहेत.
5. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील राहाणीमानाचा दर्जा सुधारत आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology) :

कोणत्याही विषयाचे संशोधन करीत असताना संशोधन हे शास्त्रशुद्ध व्हावें हा त्या पाठीमागचा उद्देश असतो. विषयाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि वस्तुस्थितीचे सत्य आकलन होण्यासाठी विषयानुरूप संशोधन पद्धतीचा अवलंब केला जातो. या संशोधनामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक संशोधन पद्धती व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केलेला असून, तथ्यसंकलनासाठी द्वितीय सामुग्री पद्धतीचा अवलंब केला आहे.

द्वितीय सामुग्री पद्धत (Secondary data method) :

द्वितीय स्रोतात लिखित ग्रंथाचा, मासिक, साप्ताहिक, विशेषांक आणि सर्वेक्षण अहवाल या दस्तऐवजांचा आधार घेत द्वितीय सामुग्रीचा जास्तीत जास्त वापर करण्यात येईल. तसेच शासनाने प्रकाशित केलेल्या पुस्तके, मासिके, अहवाल इत्यादी व विविध सामग्री गोळा करून आकडेवारीचे विश्लेषण करण्यात येईल.

अभ्यासाची साधने (Tools of Research) :

संशोधन अभ्यासाचे विश्लेषण करण्यासाठी विविध तालिका, आलेख, कॉम्प्युटर, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Importance of Research topic) :

1. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेवर संशोधन करणे महत्त्वाचे आहे.
2. महाराष्ट्र व गुजरात राज्य आरोग्यावर किती खर्च करतो या दृष्टिकोनातून संशोधनाचे महत्त्व आहे.
3. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील आरोग्य संबंधित योजना किती व कोणत्या आहेत हे जाणून घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation of the Research) :

संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यापुरती मर्यादित आहे. या दोन राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा अभ्यास केला जाईल. महाराष्ट्र व गुजरात राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवेचा अभ्यास करण्यासाठी 2000-2001 ते 2023-24 हा कालावधी राहील. ही संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण योजना (Chapter Scheme) :

1. **प्रकरण पहिले - प्रस्तावना व संशोधन पद्धती.**
2. **प्रकरण दुसरे – महाराष्ट्र व गुजरात राज्य : सार्वजनिक आरोग्य सेवा.**
3. **प्रकरण तिसरे – महाराष्ट्र व गुजरात राज्य : आरोग्य योजना.**
4. **प्रकरण चौथे – महाराष्ट्र व गुजरात राज्य: आरोग्य खर्च.**
5. **प्रकरण पाचवे – महाराष्ट्र व गुजरात राज्य : नागरिकांचे आरोग्य: खर्च व लाभ.**

6. **प्रकरण सहावे- निष्कर्ष व शिफारसी.**

संदर्भसूची (References) :

1. **डॉक्टर सतीश श्रीवास्तव/डॉक्टर विजय काकडे/डॉ रामदास माहोरे-आरोग्याचे अर्थशास्त्र {भारतातील आरोग्य सेवा धोरण यासंदर्भात}.**
2. **Aarogya Ni Rathyatra-श्री कृष्ण अकादामी राजकोट {गुजरात एडीशन}.**
3. **Ramesh Kapadia – Arogya nirman, nivjivan trust, Gujrat.**
4. **Arogya nidhi the science behind and beyond – Maalini Subrahmanianm, Notion press.**
5. **महाआरोग्य योजना, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.**
6. https://arogyasathi.gujarat.gov.in
7. https://www.myscheme.gov.in
8. https://clinicalestablishment.gipl.in
9. https://gujratindia.gov.in
10. https://nrhm.maharashtra.gov.in
11. https://www.maharashtra.gov.in

: संशोधक :

आरती भाऊसाहेब होगे

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

बी रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.